# जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, जालना

## निविदा / दरपत्रक

जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, जालना अंतर्गत कायदेशीर मदत संरक्षण सल्लागार कार्यालया करिता चांगल्या प्रतीचे ७ खिडक्यांना प्रति खिडकी अंदाजे ५ X ४ रोलर फिटींगचे पडदे खरेदी करण्यासाठी खालील तपशीलाप्रमाणे निविदा / दरपत्रक मागवित आहेत.

| Sr. No. | Particulars | Size | Rate per Sqft | Total Amount | Fitting Charge Per Window | Price with GST | Total 7 Windows price with GST |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | Roller Blinds P.V.C. Roller Blinds Rainbow-15 with | 5 X 4 sqft | | | | | |

उपरोक्त प्रमाणे खिडक्यांना रोलर फिटींगचे पडदे खरेदी करण्यासाठी सदरील पुरवठादार / संस्थेने आपले दरपत्रक सोबत दिलेल्या "नियम व अटींच्या" अधिन राहून या कार्यालयाच्या पत्त्यावर सीलबंद पाकिटावर **"खिडक्यांना रोलर फिटींगचे पडदे दरपत्रक" असा उल्लेख** करून ते **"मा.सचिव, जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, जालना"** यांचे नांवे दिनांक १५ / ०२ / २०२५ रोजी सायंकाळी ५.३० वाजेपर्यंत मिळतील, अशा बेताने पाठविण्याची व्यवस्था करावी. यानंतर प्राप्त झालेले दरपत्रक (निविदा) ग्राहय धरण्यात येणार नाही. याची नोंद घ्यावी.

सचिव
जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, जालना

दिनांक:— १० / ०२ / २०२५

# जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, जालना

या कार्यालया अंतर्गत कायदेशीर मदत संरक्षण सल्लागार कार्यालयाकरीता
७ खिडक्यांना रोलर फिटींगचे पडदे खरेदी करण्यासाठी खालील नियम व अटी लागू राहतील.

१. प्रत्येक निविदाकारास फक्त एकच दरपत्रक देण्याची परवानगी असेल, याची नोंद घ्यावी.

२. या कार्यालयाचे गरंजाची पुर्तता करण्यात येणारे व सर्वात कमी किंमतीचे दरपत्रक मंजुर करण्यात येतील.

३. निविदाकाराला अधिकृत पुरवठादार/एजन्सी लेटर हेडवर दरपत्रक सादर करणे व त्यावर जीएसटी क्रमांक नमुद करणे बंधनकारक राहील.

४. दरपत्रकामध्ये सर्व प्रकारच्या करांसह, इतर चार्जेस वगैरे, यांचा स्पष्ट उल्लेख करणे आवश्यक आहे.

५. दरपत्रक सादर करणा—या निविदाकरांचा जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, जालना या कार्यालया बरोबर कोणताही हितसंबंध नसावा, याची नोंद घ्यावी.

६. निविदाकराने प्रत्यक्ष स्थळावर भेट देऊन खिडक्यांचे मोजमाप केल्या बाबतचे प्रमाणपत्र निविदे सोबत जोडणे आवश्यक राहील.

७. दरपत्रके सादर करतांना त्यामध्ये संदर्भीय पत्राचा उल्लेख करणे बंधनकारक राहील. सदरील सिलबंद दरपत्रक ही दिनांक १५/०२/२०२५ रोजी सायंकाळी ५.३० वाजे पर्यंत या कार्यालयात स्विकारण्यात येतील. त्यानंतर प्राप्त होणारी दरपत्रके विचारात घेतली जाणार नाही, याची संबंधीतांनी नोंद घ्यावी.

८. सदरील दरपत्रके पाठवितांना ती **''मा. सचिव जिल्हा विधी सेवा प्राधिकरण'', जालना** यांचे नावे पाठविण्यात यावी, तसेच पाकिटावर **''खिडक्यांचे पडदे दरपत्रक''** असा उल्लेख करावा. व निविदाकराने सिल बंद पाकीटे ही सचिव, जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, जिल्हा न्यायालय परिसर, जिल्हा परिषदे समोर,

अंबड चौफुली जवळ, जालना या पत्त्यावर दिलेल्या मुदतीत पाठवावी.

९. सिलबंद दरपत्रके हे सचिव, जिल्हा विधी सेवा प्राधिकरण जालना यांचे समक्ष त्यांच्या निजिकक्षात दिनांक १७/०२/२०२५ रोजी उघडण्यात येतील. जर तांत्रिक अडचण निर्माण झाल्यास दुस—या दिवशी किंवा ठरलेल्या वेळेत व ठिकाणी उघडण्यात येतील.

१०. उपरोक्त खिडक्यांचे पडदे हे या कार्यालयाने आदेश दिल्यानंतर सुस्थितीत जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, जालना येथे आणुन देण्याची जबाबदारी (सर्व खर्चासह) संबंधीत पुरवठादार/संस्थेची राहिल, याची नोंद घ्यावी. वस्तु प्राप्त झाल्यानंतर या कार्यालया मार्फत वस्तु सुस्थितीत असल्या बाबतची पडताळणी करण्यात येईल. त्यानंतरच सदरील वस्तु खरेदीची रक्कम पुढील आठ दिवसांमध्ये संबंधितांच्या खात्यावर जमा करण्यात येईल.

११. सदरील दरपत्रके स्विकारण्याचा व नाकारण्याचा अधिकार मा.अध्यक्ष, जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, जालना राखून ठेवत आहे.

सचिव

दिनांक: १०/०२/२०२५

जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, जालना